# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

### शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७

### (सकाळी ९.३० ते सकाळी १०.३० वाजेपर्यंत)

(क) **(गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) —**

**सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, विक्रम काळे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा — (३० मिनिटे) —**

"सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, शेतीमालाचे पडलेले भाव आणि दरवर्षी पडणाऱ्या दुष्काळामुळे मराठवाडयातील शेतकरी हवालदिल होणे, सततच्या नापीकी आणि कर्जबाजारीपणामुळे मराठवाडयात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण लक्षणियरित्या वाढणे, मागील दोन वर्षात २१८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, यामध्ये तरुणांचे प्रमाण २५ टक्क्याहून अधिकचे असणे, मराठवाडयाच्या हक्काच्या पाण्याच्या वापरासाठी शासन कोणतीही उपाययोजना करत नसल्यामुळे मध्य गोदावरी खोऱ्यातील १८.३३ टीएमसी पाणी आंध्रप्रदेशात वाहून जात असणे, कायद्याची पायमल्ली करुन उर्ध्व गोदावरी खोऱ्यात गोदावरी नदीपात्रातील पाणी अडविण्यात आल्याने मराठवाडयातील शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होणे, नविन सिंचन प्रकल्प आणि जुन्या प्रकल्पांच्या सुप्रमांची कामे रेंगाळल्यामुळे मागील तीन वर्षात मराठवाडयात एकही मोठया सिंचन प्रकल्पाचे काम सुरु नसणे, सक्षम जल आयुक्तालय स्थापन करण्याच्या निर्णयासह औरंगाबाद येथील मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसणे, कृषीपंपाच्या विद्युतीकरणाचा वाढलेला अनुशेष आणि सततच्या खंडित वीज पुरवठयामुळे शेतकरी अडचणीत सापडणे, पिक विमा योजनेचा हप्ता भरुन घेताना घातलेल्या जाचक अटींमुळे लाखो शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण होणे, तुर खरेदी, दहा हजार रुपये तातडीचे कर्ज आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी शासनाला आलेले अपयश, यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला शासन विरोधी तिव्र असंतोष आणि संतापाची भावना, शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी शाश्वत शेतीच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **सर्वश्री.संजय दत्त,** शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स. यांची**

**म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा — (३० मिनिटे) —**

"मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे भुमिपूजन सप्टेंबर, २०१७ ला करण्याचे शासनाने ठरविले असून याकरिता जपानचे पंतप्रधान शिंजी आबे आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सदरील बुलेट ट्रेनच्या कामाचे भुमिपूजन व शिलान्यास करण्यात येणार आहे, ५०८ किलोमीटर लांब, एकूण १२ स्टेशन्स असून त्यातील चार महाराष्ट्र राज्य आणि ८ स्टेशन्स गुजरात राज्यात असणे, या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी सुमारे ९८ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार असून राज्याला २४ हजार कोटी रुपयांचा भार उचलावा लागणार असणे, मुंबई-अहमदाबाद महत्वाकांक्षी बुलेट ट्रेनसाठी मुख्य स्थानक म्हणून वांद्रे कुर्ला संकुलातील ४० हजार चौरस मीटर जागा देण्याचे राज्यशासनाने निश्चित केल्याने सदरील व्यापारी संकुलन बुलेट ट्रेनच्या प्रकल्पामुळे बाधित होणार असणे, सदरील महत्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पात राज्यात बुलेट ट्रेनचे क्षेत्र ३३ टक्के असून ६७ टक्के गुजरातमध्ये असल्याने गुजरात राज्याला सर्वाधिक लाभ होणार असल्याने समान खर्च उभारण्याबाबत राज्यातून होत असलेला विरोध, राज्याची आर्थिक परिस्थिती नाजूक असताना सरकार शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफीसाठी हजारो कोटींची घोषणा केली असून एकीकडे घोषणांचा डोंगर दुसरीकडे विकास योजनांना कात्री अशी परिस्थती आहे, या सरकारच्या काळात राज्य कमालीच्या आर्थिक संकटात सापडले आहे, राज्यात कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतमालाला हमी भाव देण्यास पैश्यांअभावी सरकार अपयशी ठरत असताना मुठभर लोकांच्या फायदयासाठी ९८ हजार कोटींच्या खर्चाचा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याने जनमानसात तीव्र असंतोष असणे, दिवसेंदिवस होत असलेले रेल्वे अपघात रोखण्यास शासनाला अपयश येत असणे, राज्य सरकार आर्थिकदृष्टया कर्जबाजारी असताना जनमानसात सदरील प्रकल्प सुरु होणार की नाही याबाबत प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे राज्यशासनाने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट करुन याबाबत तातडीने कार्यवाही करावी व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (सकाळी १०.३० ते सकाळी ११.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(मंगळवार, दिनांक १, बुधवार, दिनांक ९ व गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**

**सर्वश्री. संजय दत्त,** शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. धनंजय मुंडे,

जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री. आनंद ठाकूर,ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. किरण पावसकर, ख्वाजा बेग, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यशासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या मुंबई-नागपूर या ७१० कि.मी. लांबीच्या समृध्दी महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या शेतजमीनी, फळबागायती यांचे अधिग्रहण करण्यात येणार असून उक्त समृध्दी महामार्गासाठी बागायती, फळबागायती जमिनी देण्यास होणारा शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध मोडून काढण्यासाठी राज्यशासन पोलीस बळाचा वापर करीत असणे, कल्याण तालुक्यातील फळेगाव येथे समृध्दी महामार्गासाठी विरोध करणाऱ्या १६ शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणे, राज्यात ठाणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबादसह १० जिल्हयातील ५० पेक्षा अधिक गावांमधून समृध्दी महामार्गासाठी जमीनी देण्यास शेतकऱ्यांकडून होत असलेला तीव्र विरोध लक्षात घेता या मार्गाबाबत राज्य शासनाने दडपशाहीने जमिनी घेणार नाही अशी आपली भुमिका जाहिर केलेली असताना ती भुमिका डावलून शेतकऱ्यांच्या जमिनी दडपशाहीने ताब्यात घेण्याचा प्रकार सुरु असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गामध्ये २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केली जाणार असणे, समृध्दी महामार्गाला होणारा शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांमध्ये फुट पाडण्याचा डाव सुरु असणे, त्यासाठी काही भागातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ८४ लाख रुपयांपर्यंत मोबदला देण्याचे अमीष दाखविण्यात येत असणे, मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गावरील रस्ते आणि मेगा सिटीसाठी शेजारी बड्या आजी-माजी सनदी अधिकाऱ्यांनी शेकडो हेक्टर जमीनीची खरेदी केलेली असणे, समृध्दी महामार्गाला शहापूर, भिवंडी, नाशिक जिल्हयातील तसेच या मार्गावरील इतर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला असून या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समितीवर वनखात्याच्या जमीन मोजणीच्या कामात मज्जाव केल्याप्रकरणी पोलिसांद्वारे गुन्हा दाखल करण्यात येणे, त्यातच जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी परिपत्रक काढून शेतकऱ्यांना मोठी आमिषे दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा केलेला प्रयत्न, एकटया नाशिक जिल्हयातील इगतपूरी व सिन्नर तालुक्यातील एकूण ८२११२ हेक्टर क्षेत्रापैकी ५६१४४ हेक्टर जमिन प्रकल्पात जाणार असल्याने या तालुक्यातील शेतकऱ्यांकडे २६०६८ हेक्टर इतके कमी क्षेत्र शिल्लक राहणार असल्याने आपल्या जमिनी प्रकल्पासाठी देण्यास शिवडे गावासह ४९ गावातील शेतकऱ्यांनी केलेला तीव्र विरोध, मुंबई व औरंगाबाद येथे झालेल्या कृती

समितीच्या बैठकीत आंदोलनाची रुपरेषा निश्चित करुन समृध्दी महामार्गाच्या विरोधात ४९ गावांतील शेतकऱ्यांनी सामुहिकरित्या आत्महत्या करण्याचा शासनाला दिलेला इशारा, समृध्दी महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता संघर्ष समितीबरोबर मा.मुख्यमंत्री यांच्या झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच या महामार्गाची निर्मिती केली जाणार असल्याच्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना असुनही या सूचनांना संबंधित अधिकारी बगल देत असणे, सदर महामार्ग ज्या जिल्ह्यातून जाणार आहे त्या जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीवर अधिभार लावण्याचा निर्णय घेण्याची सुरू असलेली कार्यवाही, त्यास जनतेचा विरोध होणार असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गासंदर्भात बळाचा वापर करुन पोलिस शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करीत असणे, मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गासाठी एकूण किती जमिनींचे भूसंपादन करण्यात येणार आहे, त्यामुळे किती गावकरी/शेतकरी बाधित होणार आहेत व त्यांना कशाप्रकारे मोबदला देण्यात येणार आहे व त्यांचे कशा प्रकारे पुनर्वसन करण्यात येणार आहे, याबाबत शासनाची भुमिका स्पष्ट न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व संतापाची भावना निर्माण होणे, या समृध्दी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(शुक्रवार, दिनांक ४, बुधवार, दिनांक ९ व गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (२) ते (८) —**

(२) **सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, संजय दत्त, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबईतील चेंबुर मधील एम (पश्चिम) वॉर्डातील चटई तलाव सफाई कामात लाखोंचा भ्रष्टाचार झाला असल्याचे माहे जून, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, या तलावाच्या कामामध्ये भ्रष्टाचार सुरुच असून दरवर्षी या तलावाच्या सफाईसाठी पालिकेकडून १५ ते २० लाखांचा निधी मंजूर केला जाणे, तथापि दरवर्षी ही सफाई अर्धवटच केली जात असल्याने तलावातील घाण तशीच पडून राहून येथील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका होत असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे शासनाने गेल्या १० वर्षातील या तलावाच्या सफाईसाठी झालेल्या खर्चाची तपासणी करुन पालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. गिरीशचंद्र व्यास,** प्रा. अनिल सोले, श्री. नागोराव गाणार, **वि.प.स.**

पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नागपूर शहराला हिरवेगार करण्याकरीता सन २०१२-१३ ते २०१५-१६ या ५ वर्षात नागपूर सुधार प्रन्यास मार्फत १९ कोटी रूपये खर्च करून १ लाख ६० हजार झाडे लावण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणे, या कार्यक्रमाकरीता येणारा खर्च १९ कोटी पेक्षा जास्त रकमेचा असल्यामुळे सदर झाडे लावण्याचे टेंडर पुणे येथील बी.व्ही.जी. कंपनीला अधिक दराने देण्यात येणे, यावरूनच या कंत्राटामध्ये ना.सु.प्र. मधील अधिकाऱ्यांचे हात गुंतलेले असल्याचे दिसून येणे, १ लक्ष ६० हजार झाडे लावण्याचा उपक्रम जर ना.सु.प्र.ने पूर्ण केला तर नागपूरच्या भौगोलिक क्षेत्रफळाचा विचार करता नागपूर शहर पुर्णपणे हिरवेगार झाले असते, मात्र प्रत्यक्षात १ लक्ष ६० हजार झाडे नागपूर शहरात लावण्यातच आलेली नसल्याचे दिसून येणे, कंपनीला हे वृक्षारोपण चार महिन्यांच्या कालवधीत करावयाचे असणे, त्याप्रमाणे दर दिवशी साधारण १३३० वृक्ष लागवड करणे गरजेचे असणे, परंतु ते झालेले दिसत नसणे, सर्व वृक्षांच्या संरक्षणासाठी ट्री गार्ड लावणे गरजेचे असल्याचे कंत्राटामध्ये नमूद असणे, परंतु कुठेही ट्री गार्ड लावलेले न दिसणे, कंत्राटाप्रमाणे जर ट्री गार्ड चोरीला गेले अथवा तोडफोड होऊन नुकसान झाले तर ते सात दिवसांत स्वखर्चाने बदलून देणे गरजेचे असणे, परंतु आजमितीस बहुतांश झाडांना ट्री गार्डच नसणे, म्हणजेच ट्री गार्ड बसवलेले नसताना याबाबतची रक्कम काम न करताच उचल करण्यात येणे, सदर कंत्राटामध्ये जर उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही तर त्याबाबत कंत्राटदाराला दररोज प्रत्येक झाडामागे ३००० रुपये दंड ठोठावण्याची तरतूद असणे, मात्र असेही ना.सु.प्र.ने केलेले नसणे, सदर निविदेची देयके अधिकार नसताना ना.सु.प्र.च्या संबंधीत अधिकाऱ्यांनी मंजूर करणे व त्याची रक्कम कंत्राटदाराला अदा करण्यात येणे, मूळात ना.सु.प्र.ने कंत्राट दिलेल्या बी.व्ही.जी. कंपनीने १,६०,००० वृक्षांची रोपणे केलेलीच नसणे, जर असे केले असते व झाडे जरी मृत झाली असती तरी मात्र १,६०,००० वृक्षांपैकी अनेक वृक्षांची ट्री गार्ड जागेवर उभी राहीली असती; परंतु असेही प्रत्यक्षपणे दिसत नसणे, एकंदरीत ना.सु.प्र. ने वृक्षारोपणासाठी काढलेले १९ कोटी रुपयांचे टेंडर व त्यानंतर वृक्षारोपण व त्यातील ५० टक्के झाडे मृत झाली आहे असे दाखवणे हा बनावटीचा प्रकार असून ना.सु.प्र. व बी.व्ही.जी. कंपनी, पुणे यांनी संगनमताने फसवणूक केलेली असून १९ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला असणे, त्यामुळे सदर प्रकरणी ना.सु.प्र.चे अधिकारी व संबंधीत कंपनीवर फसवेगिरीचा गुन्हा दाखल करून सदर प्रकरणाची सी.बी.आय कडून चौकशी करण्याची होत असलेली मागणी, तसेच याला जबाबदार कंत्राटदार व संबधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने

तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्री. किरण पावसकर, ॲड. राहुल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मौजे आंबिवली ता.अंधेरी येथील जमीन सर्व्हे नं. १४२ अ नभूक्र. ८३३ पै. मालती वसंत हाटे ट्रस्ट यांना नाममात्र १ रुपया वार्षिक भुईभाडे आकारुन शासनामार्फत दिलेली असणे, सदर संस्थाचालकांनी मूळ एक अधिक अतिरिक्त चार असे एकूण पाच चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम केलेले असणे, सदर संस्थेस अनर्जित रक्कम १७४.८७ कोटी रुपये भरण्यास जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी आदेश पारीत केलेले असणे, सदर अनर्जित रक्कम वसूल करण्यास शासनाकडून दिरंगाई केली जात असणे, सदर रुग्णालयाचे बांधकाम करताना महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, यामुळे नागरीकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, मात्र त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.बाळाराम पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील सायन - पनवेल महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाची जबाबदारी सायन - पनवेल टोल्वेज या कंपनीकडे असतानाही सदर कंपनीने दुरुस्तीचे काम योग्य प्रकारे न केल्याने या महामार्गावर झालेल्या एका अपघातात दोघांचा मृत्यु होण्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास घडणे, सदर महामार्गावरील टोलमधून लहान वाहनांना सूट दिल्याने शासनाने कंपनीला १०३ कोटी रुपयांची नुकसान भरपाई विलंबापोटी विलंब शुल्क देत असतानाही कंपनीने देखभाल दुरुस्तीचे काम योग्य पध्दतीने न करणे, त्यामुळे शासनाने स्वतंत्र निविदा काढून रस्त्याच्या देखभालीसाठी मागील ३ वर्षात ६ कोटी व या वर्षी पुन्हा ३ कोटी रुपयांचा खर्च करणे, या कंपनीने दुरुस्तीची अनेक कामे ज्यामध्ये पादचारी पूल, भूयारी मार्ग, निर्देशक पट्टे, खड्डयांची दुरुस्ती तसेच पथदिव्यांची दुरुस्ती योग्य प्रकारे न केल्याने होणारे अपघात व त्यातून नागरीकांचे होणारे मृत्यू, या मृत्यूस जबाबदार धरुन कंपनीच्या संचालकांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, सदर रस्त्यावरील अवजड वाहनांची विशेष पथक व तंत्रज्ञानाव्दारे मोजणी करुन

कंपनीस देण्यात येत असलेल्या भरपाईचा फेर आढावा घेवून सदर रस्त्यावर मागील ३ वर्षात देखभाल दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चाची कंपनीच्या नुकसान भरपाईतून वसूली करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, देखभाल दुरुस्तीस हलगर्जीपणा केल्यामुळे कराराचा भंग होत असल्याने कंपनीचा करार रद्द करण्याची आवश्यकता, कंपनीच्या धोरणामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान, जनतेची होणारी जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी कंपनीवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री. किरण पावसकर,** धनंजय मुंडे, हेमंत टकले, सुनिल तटकरे, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. अनिल भोसले, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:- **(चर्चा अपूर्ण)** -

"मुंबईतील बोरीवली येथील देवीपाडा येथे झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाने मेसर्स सद्‌गुरु एन्टरप्रायजेसच्या विकासकांला ९ इमारती बांधण्याची मंजुरी देण्यात येऊन ९ इमारतीपैंकी विकासकाने ८ इमारती बांधून पूर्ण करणे, त्यापैकी इमारत क्र. १ ते ४ या इमारती झोपडपट्टीधारकांसाठी असून इमारत क्र. ५ ते ८ खुल्या विक्रीसाठी विकासकाने बांधलेल्या असणे, इमारत क्र.७ सिंधुदूर्ग एस.आर.ए सह.गृहनिर्माण संस्था ही विकासकाने असहकार तत्वावर नोंदणीकृत केलेली असून या संस्थेत १५० मध्यमवर्गीय सभासद वास्तव्यास असणे, या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले असून इमारत क्र. ८ सद्‌गुरु मिलेनियम टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेला विकासकांच्या असहकार्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र अद्यापही देण्यात न येणे, इमारत क्र. ७ व ८ यामध्ये असणारी जागा उद्यानासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली असून अद्यापही विकासकाने जाणुनबुजून याठिकाणी उद्यान बांधलेले नसणे, तसेच या इमारतींच्या मलकुंडावरुन (Septic Tank) विकासकाकडून अनधिकृतरित्या खोदकाम तसेच रस्ता करण्यात तयार करण्यात येणे, त्यामुळे मल कुंडाची नासधूस होऊन त्यातून घाणीचे उत्सर्जन होऊन परिसरातील सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याची भीती, या मोकळया व राखीव असलेल्या ठिकाणी विकासक प्रकल्पबाधितांसाठी महानगरपालिकेस देय असलेल्या जागेवर स्वतंत्र इमारत बांधण्याचा प्रयत्न करीत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्रांद्वारे गृहनिर्माण सोसायटीची स्थापना करुन शासन व म्हाडाची सुमारे ४० कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी चेंबूर येथील टिळकनगर पोलिस ठाण्यात सोसायटीच्या माजी पदाधिका-यासह सहा जणांविरुध्द गुन्हे दाखल होणे, यामध्ये एक पोलिस आयुक्त, माजी पोलीस निरिक्षक, आणि प्रत्येकी दोन हवालदार व बांधकाम व्यावसायिकांचा समावेश असणे, यामध्ये शासन व म्हाडाच्या २० टक्के घरांची परस्पर विक्री करुन अपहार करण्यात येणे, खोटी कागदपत्र तयार करुन शासन व म्हाडाची फसवणूक करण्याच्या प्रकरणांमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाढ, उपरोक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(८) **सर्वश्री. विनायकराव मेटे,** आनंद ठाकूर, हेमंत टकले, जगन्नाथ शिंदे, सुनिल तटकरे, गोपीकिसन बाजोरिया, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अकोला जिल्ह्यातील बाळापुर येथील पारस औष्णिक वीज प्रकल्प १२०० मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्पात टप्याटप्याने सुरू करण्याचे नियोजन तत्कालीन सरकारने करणे, यासंदर्भात राज्य व केंद्र सरकारद्वारे शासनस्तरावरच नियोजनबध्द पध्दतीने आखणी करण्यात येऊन आवश्यक त्या बाबींची तरतूदही करणे, असे असतानाही सद्य:स्थितीत राज्यशासनाकडून वीज प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी होत असलेला विलंब व विरोध, या प्रकल्पात ६६० मेगावॅट ऐवजी केवळ २५ मेगावॅट या सौर उर्जा प्रकल्प राबविण्याचा राज्यशासनाने घेतलेला निर्णय, परिणामी स्थानिक प्रकल्पग्रस्त, शेतकरी तसेच बेरोजगार यांच्यामध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र संताप, महिला संस्था तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून या सौर ऊर्जा प्रकल्पास होत असलेला विरोध, या विरोधात ग्रामस्थांनी मोठया संख्येने आंदोलन छेडण्याचा दिलेला इशारा, सदर प्रकल्प राबविताना फक्त १२०० मेगावॅटचा वीज निर्मिती प्रकल्प राबविण्याची गरज, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही, करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक ८, बुधवार, दिनांक ९ व गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (९) ते (१३) —**

(९) **श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"रायगड जिल्हयातील मुरुड-जंजिरा नगरपरिषदेत सन २०११ पासून अनेक गैरप्रकार व शासकीय निधीचा होत असलेला अपहार तसेच न केलेल्या कामांची बीले अदा करण्यात आल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, रस्त्यांच्या कामांमध्ये नियमाप्रमाणे खोदाई न करता ९०० ते ९५० ट्रक खडी-माती काढल्याचे दाखवून त्यावर एकंदर २८ लाखांपेक्षा जास्त रक्कम काम न करता उचलण्यात येणे, एम.बी. वर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नसताना देखील बिले अदा करण्यात आलेली असणे, तसेच एम.बी. पुस्तिकेमधील मापांमध्ये अनियमितता झाल्याचे स्पष्ट दिसत असणे, नळपाईप लाईनचे काम जीवन प्राधिकरण यांचेमार्फत झालेले असताना व त्या कामाचे पैसे जीवन प्राधिकरणाने दिलेले असतानाही, नगरपरिषदेमार्फत १७ लाखांचे बील काढण्यात आलेले असणे, साडेतीन कि.मी. पाईपलाईन व डिझेलपंप सुस्थितीत असतानाही ते भंगारात विकण्यात येणे, त्यामुळे शासकीय निधीचा करोडो रुपयांचा अपहार होणे, याबाबत तेथील नगरसेवकांनी शासनस्तरावर तक्रारी करुनसुध्दा अद्यापही कोणतीच कारवाई न होणे, त्यामुळे जनमानसात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अहमदनगर शहरात कायम बहुचर्चित राहिलेल्या उड्डाणपुलाचे काम रखडलेले असल्याने शहराचा विकास रखडलेला असणे, त्यामुळे शहरातील नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून शहरामधून जाणाऱ्या औरंगाबाद राज्य महामार्गाच्या कामात उड्डाणपुलाच्या कामाचा देखील समावेश असणे, परंतु संबंधित कंपनी पुलाचे काम करण्यास तयार नसल्यामुळे अर्धवट स्थितीत असलेला रस्ता व उड्डाणपुलाचे कामही पूर्ण न झाल्याने शहराच्या विकासास येत असलेली बाधा, या कामांबाबत वारंवार संबधित प्रशासनाकडे तक्रार व निवेदने देऊनही प्रशासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे अहमदनगर शहरातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन अनेक वर्षापासून रखडलेल्या या पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **सर्वश्री. ख्वाजा बेग,** किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबईतील बांद्रा-खार परिसरात मोठ्या प्रमाणावर खाजगी विकासकांकडून इमारतींचा होत असणारा पुनर्विकास, सदर परिसरात (१.) मे. के. मुरर्दानी रियालिटी, सी.टी.एस.नं.ई/१४४, व्हीलेज, बांद्रा-खार (प)

मुंबई (२.) मे. के. मुरर्दानी रियालिटी, जी/६१०, व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (३.) एम.एन.के.बिल्डर्स प्रा.लि. सी.टी.एस.नं.ई/ १७०, १६ वा रस्ता खार (प) मुंबई. (४.) मे. मुरर्दानी रियालिटी, सी.टी.एस.नं.ई/३८८, व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (५.) परमवीर कन्स्ट्रक्शन, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (६.) मार्क कन्स्ट्रक्शन, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई. (७.) स्कायलाईन व्हेंचर, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई. (८.) स्कायलाईन हॉस्पिटॅलिटी, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई. या कंपन्यांनी मुंबईतील विकासक नियंत्रण नियमावली डी.सी.आर. ३३ (१४) च्या अंतर्गत झोपडपट्टी विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करणे, डिसी.आर. ३३ (१४) च्या अनुषंगाने विकासकाने विनामूल्य संक्रमण शिबिरातील गाळे ( ट्रांन्झीट टेनामेंट ) बांधून दिले तर त्याबदल्यात विकासकाला अधिक क्षेत्रफळ मिळू शकेल, या करारानुसार या कंपन्यांनी ३३ (१४) च्या अनुषंगाने बांद्रा-खार परिसरातील बहुमजली इमारतींचे केलेले बांधकाम त्यात ३३ (१४) अंतर्गत शासनाच्या अटी शर्तींचे पालन न करणे, नियमाप्रमाणे अद्यापी ट्रांन्झीट टेनामेंट बांधून न देणे, विकासकांनी या बहुमजली इमारतीमधील सर्व फ्लॅट विकले असून त्यांना पाणी पुरवठा व वीज पुरवठा देण्यात येणे, वर नमूद केलेल्या विकासकांनी नियमाप्रमाणे एस.आर.ए. ला सुमारे २१० पेक्षा अधिक गाळे उपलब्ध करुन एस.आर.ए.च्या ताब्यात देणे बंधनकारक असतानाही गाळे अद्यापी ताब्यात न देणे, परिणामी शासनाचे सुमारे ५०० ते ७०० कोटींचे झालेले नुकसान, विकासकांकडून झालेल्या फसवणुकीबाबत खार पोलीस ठाणे येथे विकासकांविरुध्द गुन्हा नोंदवूनही अद्यापी कोणतीही कारवाई न होणे, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, शासनाबद्दल निर्माण झालेली संतापाची भावना, सदर गुन्हा आर्थिक गैरव्यवहाराचा व शासनाच्या फसवणूकीचा असल्याने शासनाने सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे पाठवून (ई.ओ.डब्ल्यु मार्फत) सखोल चौकशी करुन वरील कंपन्यांना काळया यादीत समाविष्ट करुन कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"रायगड जिल्ह्यात दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरिडॉरअंतर्गत होऊ घातलेल्या दिघी पोर्ट इंडस्ट्रियल एरिया या प्रकल्पासाठी राज्य शासनाने शेतकऱ्यांकडून गेल्या चार वर्षापूर्वी जमिन संपादित करणे, या संपादनाविरुध्द कार्यकर्त्यांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी आंदोलन केल्यानंतर संपादनातील क्षेत्र ६७,५०० एकरावरुन कमी करुन सुमारे १५८६५ एकर पर्यंत करण्यात येणे, सन २०१३ मध्ये कॉरिडॉरच्या केंद्रीय महामंडळाने सदर संपूर्ण क्षेत्र

संपादनातूनच वगळण्याचा आदेश लेखी पत्राद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने देणे, असे असतांनाही तत्कालिन उद्योग मंत्री यांनी या निर्णयाला न जुमानता संपादन सुरु ठेवणे, म.औ.वी.अ.नियम, १९६१ अन्वये ही प्रक्रिया सुरक्षित असून कोणतीही सक्ती शेतकऱ्यांवर करणार नसल्याचे सांगूनही या परिसरातील १० गावांच्या भातशेती व सिंचित जमिनी जबरदस्तीने घेण्याची प्रक्रिया शासनाने सुरु ठेवणे, शासकीय अधिकाऱ्याद्वारे शेतकऱ्यांवर दलालांमार्फत दबाव आणण्यात येऊन शेतकऱ्यांना धमकवण्यात येणे, तसेच भूसंपादन अधिकाऱ्यांद्वारे संयुक्त जमिन मोजणी न करताच रक्कम वाटण्यात येणे, त्याचबरोबर शेतकऱ्यांकडून संमतीपत्रात सदर नुकसान भरपाई बाबत कोणत्याही न्यायालयात मी दाद मागणार नाही, आक्षेप घेणार नाही आणि घर बांधकाम, झाडे, विहिर यांची कोणतीही नुकसान भरपाई मागणार नाही व शासकीय नोकरीसाठी आम्ही अनुज्ञेय नाही असे लिहून घेण्यात येणे, त्याचबरोबर या संपादनाची कलम ३२/२ ची नोटीस अनेकांना न पोचणे, अनेक मयतांच्या नावाने नोटीसा काढण्यात आल्याने वारसापर्यंत नोटीसा न पोहोचणे, यामुळे प्रत्यक्षात फक्त १६ टक्के जमिनधारकांनी संमती दिलेली असणे, ३५ टक्के शेतकऱ्यांनी हरकत घेणे मात्र ४७ टक्के शेतकरी हरकत घेऊ न शकणे तरीही त्यांनी संमती दिल्याचे गृहित धरुन बळजबरीचे धोरण अवलंबविण्यात येणे, सद्यःस्थितीत फक्त १० गावांची सुमारे ३२०० हे. जमिन संपादित करणार असे सांगून या दहा गावात ६८ टक्के जमिनीची संमती मिळाल्याचा दावा शासन करीत असणे, परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये शासनाच्या या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोष व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने तातडीने सक्तीचे संपादन थांबवून, आधी संमती दिलेल्या शेतकऱ्यांची बेकायदेशीर संमतीपत्रे रद्द करुन त्यांना सन २०१३ च्या जमिन संपादन कायद्यानुसार भरपाई व पुनर्वसन देण्याची आवश्यकता, संमती मिळालेल्या जमिनीत असणारे कुळाचे, खंडकरी शेतकरी, शेतमजूर यांचे अधिकार नोंदविण्याची आवश्यकता तसेच त्यामध्ये झालेले फसवणूकीचे व्यवहार रदद करण्यासाठी विशेष समिती नेमण्याची गरज, उर्वरित ६८ गावांतील शेतकऱ्यांचा सातबारा वरील संपादनाचे शिक्के काढून ते क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची आवश्यकता, नुकसानभरपाईच्या वाटपात सुरु असलेल्या भ्रष्टाचाराची महसूल खात्याकडून चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **सर्वश्री. श्रीकांत देशपांडे,** धनंजय मुंडे, दत्तात्रय सावंत, बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.विक्रम काळे, सतीश चव्हाण, कपिल पाटील, नागोराव गाणार, जयवंतराव जाधव, प्रा.जोगेन्द्र कवाडे, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण

दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल सामाजिक आरक्षित संवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेचे शुल्क कुणाला १००%, कुणाला ५०% प्रतिपूर्ती करण्याचे शासनाचे धोरण असणे, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या आर्थिक वर्षातील प्रतिपूर्ती आजपर्यंत न होणे, २०१७-१८ मधील विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी असलेले पोर्टल गेल्या तीन महिन्यांपासून बंद असणे, यामुळे २०१६-१७ व २०१७-१८ मधील हजारो विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती न होणे, मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०१५-१६ संपले तरी अद्याप मिळालेली नसणे, औरंगाबाद विभागातील ४८०३९ एवढे विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या प्रतिक्षेत असणे, शिष्यवृत्तीसाठी संस्था व विद्यार्थ्यांनी संबंधित विभागाकडे चकरा मारुनही त्यांना विविध कारणे सांगून शिष्यवृत्ती दिली जात नसणे, फक्त औरंगाबाद जिल्हयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ६५ कोटी रुपयांची गरज असणे, शैक्षणिक वर्षात शिष्यवृती मिळत नसल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य घेण्यास अडचणी येत असणे, यामुळे खाजगी विनाअनुदानित शिक्षक शिक्षकेतर व व्यवस्थापन यांच्यावर आर्थिक संकट ओढविणे, परिणामी विद्यार्थ्यांकडून सक्तीची वसुली होणे, यामुळे पालक, विद्यार्थी, व्यवस्थापन, शिक्षक, शिक्षकेतर यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या शैक्षणिक वर्षांची शिष्यवृत्ती लवकरात लवकर विद्यार्थ्यांना देण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (१४) व (१५)) —**

**(१४)** **श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नागपूर येथे अंदाजे ९००० कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात येत असलेला मेट्रो रेल्वे प्रकल्प, या प्रकल्पावरील सर्व खर्च चीन, फ्रांस व अन्य देशांकडून कर्ज काढून करण्यात येत असणे, प्रत्यक्षात मात्र मेट्रो प्रकल्पाची आवश्यकताच नागपूर शहराला नसणे, जयपूर येथे देखील मेट्रोचा प्रकल्प सुरू असणे, मात्र हा प्रकल्प लाखो रुपयांच्या तोट्यात असणे, जयपूर शहरातील लोकांचे या मेट्रो प्रकल्पाकडे दुर्लक्ष असून मेट्रो प्रवासाकडे लोकांनी पाठ फिरवणे, नागपूरमध्ये मेट्रोची अनेक ठिकाणी मेट्रो स्टेशन असणे, त्यापैकी अंबाझरी तलावाच्या बाजूने मेट्रोचे खांब उभे करण्यात येणे, या तलावाचे बांधकाम मातीगोटयाचे असणे यामुळे तलावाच्या बांधाला धोका निर्माण होऊन बांध फुटण्याची शक्यता नाकारता येत नसणे, त्यामुळे तेथील

अनेक वस्त्या वाहून जाण्याची व प्राणहानी होण्याची सुध्दा दाट शक्यता असणे, मेट्रोचे खांब उभे करण्यास डॅम सेफ्टी ऑरगनायझेशनची परवानगी नसणे, तसेच त्याठिकाणी बांधकामाला नागपूर महानगरपालिकेची सुध्दा परवानगी नसणे, अंबाझरी तलाव अर्थन तलाव असणे, डॅम सेफ्टी ऑरगनायझेशन नियमानुसार ३०० मिटर पर्यंत बांधकाम न करण्याचा केंद्र सरकार व राज्य शासनाचा नियम असणे, हे मेट्रो स्टेशन झाल्यास नियमभंग होण्याची शक्यता असणे, अंबाझरी तलावाच्या समोर क्रेझी केसल नावाचा पर्यटन प्रकल्प सुरू असणे, हा प्रकल्प नागपूर शहराकरीता अत्यंत उपयुक्त व पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असणे, त्या ठिकाणी हजारो कामगारांना रोजगार प्राप्त झालेला असणे, त्यांच्या कुटूंबांचा उदरनिर्वाह क्रेझी केसल हया प्रकल्पावर अवलंबून असणे, त्या ठिकाणी मेट्रो स्टेशन आल्यास हजारो नागरिक बेरोजगार होण्याची शक्यता असणे, यामुळे अत्यंत दहशतीचे वातावरण निर्माण होणे, मेट्रो स्टेशन अंबाझरी तलावाच्या बाजूला झाल्यास त्याठिकाणी अत्यंत अपुरी जागा असल्यामुळे शेकडो अपघात होण्याची शक्यता असणे, यावर उपाय करावयाचा असल्यास मेट्रो स्टेशन अंबाझरी तलावाच्या बाजूला न बांधता व्ही.एन.आय.टी. कॉलेज नागपूर येथील जमीन अधिग्रहित करून तसेच अन्य उपलब्ध जागा अधिग्रहित करून त्या ठिकाणी मेट्रो स्टेशन तयार केल्यास, डॅम सेफ्टी ऑरगनायझेशनच्या नियमानुसार प्रकल्प पूर्ण होण्याची व क्रेझी केसल हा प्रकल्प सुरक्षित राहुन हजारो नागरिक बेराजगार होण्यापासून वाचणार असणे, याची शासनाने गंभीर दखल घेवून मेट्रो रेल स्टेशन अंबाझरी तलावाच्या बाजूला न बांधता व्हीएनआयटी कॉलेज नागपूर येथे बांधणे, संयुक्तिक व नियमानुसार असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१५) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री. धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, सर्वश्री. नरेंद्र पाटील, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील विविध महामंडळांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न नेहमी ऐरणीवर येणे, तसेच सदर महामंडळातील कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन अत्यल्प असणे, महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध संघटना ह्या मा.मुख्यमंत्री महोदय यांना भेटून कर्मचाऱ्यांना वेतन वाढवून देण्याबाबत तसेच विविध महामंडळातील कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत वारंवार करत असलेली आग्रही मागणी, अशाच महामंडळांपैकी एक असलेले राज्य परिवहन महामंडळ (एस.टी.) यातील कार्यरत असलेल्या काही संघटनांनी राज्य परिवहन महामंडळ शासनामध्ये

विलिन करुन सदर महामंडळातील कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व भत्ते लागू करण्याची केलेली मागणी, तसेच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू करण्यात येणार आहे, त्याचधर्तीवर राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळातील संघटनांची असेलेली आग्रही भुमिका, एस.टी. कामगारांच्या वेतन वाढीचा करार करण्याची मुदत संपूनही अद्याप नवीन करार व वेतन वाढ झालेली नसणे, वेतन वाढ, कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांमध्ये वाढ करण्यासंबंधी नेमलेल्या वेतन सुधारणा समितीने आपला अहवाल महामंडळास सादर करुनही त्यावर निर्णय न होणे, मा. परिवहन मंत्री यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजीपर्यंत वेतन वाढीचा निर्णय घेण्याचे निर्देश महामंडळास देऊनही त्याबाबत अद्याप निर्णय न होणे, त्याकरिता सदर संघटनांनी मुंबई येथील आझाद मैदानावर केलेली आंदोलने, तसेच अवलंबित असलेला उपोषणाचा मार्ग, परंतु त्यांच्या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे शासनाप्रती राज्य परिवहन कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, त्यामुळे राज्य परिवहन महामंडळ शासनामध्ये विलीन करुन सदर महामंडळातील कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(क)** गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री. सुनिल तटकरे व इतर वि.प.स. यांचा "**राज्यातील आदिवासी विकास विभागात झालेल्या गैरव्यवहाराबाबत** या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३१७४०.

**(ख) तारांकित प्रश्न.**

**(ग) मुख्यमंत्री** : "**जुहू तारा रोड मुंबई येथील इस्टेला मद्यपान गृहामुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबत**" या विषयावरील श्री.नारायण राणे, वि.प.स. यांचा दिनांक २६ जुलै, २०१७ रोजीच्या प्रश्नोत्तरांच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक ३०९१३ चे **सुधारित उत्तर** सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(घ) ग्रामविकास मंत्री** "**मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी यांनी पुर्नपडताळणी शिफारसपात्र शिक्षकांना पदस्थापना देण्यासाठी विलंबाचे धोरण राबविल्याबाबत**" या विषयावरील श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स. यांचा

तारांकित प्रश्न क्रमांक ३३८३५ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | **वित्त मंत्री** | : | "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाच्या (१) महसुली क्षेत्रावर अहवाल (२) सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल (३) स्थानिक संस्था अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (ख) | **शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री** | : | "महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (सुधारणा) नियम, २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक सीईटी. २०१५ / (प्र.क्र.१४९) / टीएनटी-१, दिनांकित २२ जून, २०१७" सभागृहासमोर ठेवतील. |
| (ग) | **गृहनिर्माण मंत्री** | : | "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण वांद्रे, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र" सभागृहासमोर ठेवतील. |
| (घ) | **आदिवासी मंत्री** | : | "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा बारावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (ङ) | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | : | "महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षांचे अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (च) | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** | : | "अपंग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सन २०११-२०१२ ते सन २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (छ) | **कामगार मंत्री** | : | **(१)** "नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असरंक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन २००७-२००८, सन २००८-२००९ व सन २००९-२०१० या वर्षांचे अनुक्रमे चौतीसावा, पस्तीसावा व छत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.<br>**(२)** "महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचा सन २००७-२००८ ते सन २०११-२०१२ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |

तीन : **"लोकलेखा समितीचा सव्वीसावा अहवाल सादर करणे."**

चार : **म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(क) नियमित निवेदने —**

(१) **श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५५** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

"दिनांक २३ जुलै, २०१७ रोजी मुंबईतील वांद्रे येथे राहणाऱ्या जागृती होगळे या महिला बाईक रायडरचा डहाणू-जव्हार रस्त्यावरील खड्डयांमुळे झालेला मृत्यू."

(२) **डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५०** वर **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

"सन २०१७-२०१८ मध्ये टेक्निकल व प्रोफेशनल एज्युकेशन घेत असलेल्या मुलांसाठी असलेल्या मायनॉरिटी स्कॉलरशिप-नॅशनल स्कॉलरशिपच्या मुदतवाढीचा कालावधी वाढवून मिळण्याबाबत."

(३) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५२** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** निवेदन करतील :-

"रिलायन्स व आयडी.टी. कंपनीने पाचवड उड्डाण पुलाचे व रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे केलेले काम."

(४) **श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स.यांच्या** पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५१** वर **ऊर्जा मंत्री** निवेदन करतील:-

"दाभोळ वीज प्रकल्प अनेक अडचणींचा सामना करीत असून दाभोळ वीज प्रकल्पावर तयार होत असलेल्या वीजेला २०१४ नंतर खरेदीदार नसल्याने हा प्रकल्प काही काळ बंद असणे."

(५) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५४** वर **सार्वजनिक आरोग्य मंत्री** निवेदन करतील :-

"संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मु.पो.कोंड/उमरे या गावांना उपचाराच्या अद्ययावत सोयीसुविधा पुरवून गावामध्ये असलेले सरकारी हॉस्पीटल २४ तास सुरु ठेवण्याबाबत."

(६) **श्री.सुनील तटकरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५३** वर **रोजगार हमी योजना मंत्री** निवेदन करतील :-

"महाड (जि.रायगड) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण

योजने अंतर्गत झाडांची रोपे लावण्याचे काम केलेल्या मजुरांना त्यांचा पगार मिळालेला नसणे."

**(ख) शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजीसाठी प्राप्त झालेली निवेदने -**

(१) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ९** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"राज्यात मधूर भांडारकर दिग्दर्शित इंदू सरकार चित्रपटात वादग्रस्त विषय हातळल्याने या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत राज्यात होत असलेला विरोध."

(२) **सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३९** वर **पाणी पुरवठा मंत्री** निवेदन करतील :-

"पैठण तालुक्यातील पाणी पुरवठा योजनेमध्ये कोट्यावधी रुपयांचा झालेला भ्रष्टाचार."

(३) **श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५७** वर **जलसंपदा मंत्री** निवेदन करतील :-

"मौजे पद्मावती (ता.भोकरदन, जि.जालना) येथील धरणाचा विस्तार व उंची वाढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी बुडीत क्षेत्रात येत असून जमिनीचा मावेजा न दिल्याने शेतकरी अडचणीत येणे."

(४) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५८** वर **वने मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यात गेल्या सहा महिन्यांत १६ वाघांचा मृत्यू झाल्याची बाब राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पाच्या अहवालात दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी उघडकीस येणे."

(५) **श्री.सुनील तटकरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५९** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

"रायगड जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गवर १० ब्रिटीशकालीन पूल धोकादायक झाले असून सदर पुलांवर दुर्घटना होण्याची शक्यता."

(६) **आर्कि.अनंत गाडगीळ, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६२** वर **महिला व बालविकास मंत्री** निवेदन करतील :-

"पुण्यातील मुलांच्या ऑब्झर्वेशन केंद्रात मुलांना अश्लिल

व्हिडीओ पहायला, संडास साफ करायला व त्याहून भयानक म्हणजे लैंगिक चाळे करायला भाग पाडल्याचे उघडकीस येणे."

(७) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६७** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

"पुणे येथील ससून रुग्णालयातील नवीन इमारतीमध्ये सुरक्षा व आग नियंत्रणासाठी फायर अलार्म स्मोक डिटेक्शन बसविण्याच्या निविदा प्रक्रियेत अटी व शर्तींचा भंग झाला असणे."

(८) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६८** वर **पाणी पुरवठा मंत्री** निवेदन करतील :-

"संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मु.पो.कोंड/उमरे गावातील नळपाणी पुरवठा करणारी पाईपलाईन २५ वर्षे जुनी असून नादुरुस्त असल्याचे आढळून येणे."

(९) **श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६९** वर **सामाजिक न्याय मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यात गेल्या १४ वर्षांत आश्रमशाळांमधील ८७७ विद्यार्थ्यांचा सर्पदंशाने झालेला मृत्यू."

(१०) **श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ७३** वर **सामाजिक न्याय मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील १५० आश्रमशाळांच्या तपासण्या करुन अनुदानासाठी निकष पात्र करण्यासाठीची होत असलेली मागणी."

(११) **श्री.सुनील तटकरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ७४** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

"पनवेल (जि.रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरातील सर्व इमारती धोकादायक अवस्थेत असणे."

**पाच : (क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री.जयंत पाटील, विनायक मेटे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"चांदूर रेल्वे तालुका, जिल्हा अमरावती येथे दिनांक १७ जून, २०१७ रोजी एका मुलीने केलेल्या आत्महत्येच्या घटनेचे वार्तांकन

करण्यास गेलेल्या तीन पत्रकारांना पोलीसांनी बेदम मारहाण करणे, राज्य पुरस्कारप्राप्त पत्रकार श्री. प्रशांत कांबळे, श्री. अभिजित तिवारी व श्री. गुड्डु शर्मा या तिन्ही पत्रकारांविरुध्द भा.दं.वि. कलम ३५३, १४३, १४७, १४९, ३२३, ४२७ अन्वये गंभीर स्वरुपाचे खोटे गुन्हे पोलीसांनी दाखल करणे, या तिघाही पत्रकारांना १०० पोलीसांनी गराडा घालून सराईत गुन्हेगारांप्रमाणे बेदम मारहाण करणे, अट्टल गुन्हेगारांप्रमाणे वागणूक देणे, शिवीगाळ करणे, आवश्यकता नसताना मा. न्यायालयाकडून वारंवार पोलीस कोठडीची मागणी करुन पुन्हा पुन्हा मारहाण करणे, जिल्हा पोलीस अधिक्षक अविनाश कुमार, चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे ठाणेदार ब्रम्हदेव शेळके हे स्वत:ही या मारहाणीत सहभागी होणे, तिवसा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक श्री. बोरकर यांचे कार्यक्षेत्र नसतानासुध्दा त्यांना पोलीस स्टेशनमध्ये येण्यास सांगून त्यांच्याकडून पत्रकारांना मारहाण करण्यात येणे, पत्रकारांनी पोलीसांचे अवैध धंदे उघड केल्याने हा राग काढल्याचा आरोप असणे, राज्यात पत्रकार संरक्षण कायदा लागू झालेला असतांनाही पत्रकारांनाच खोट्या गुन्ह्यात अडकवून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभामध्ये भितीचे व दडपशाहीचे वातावरण निर्माण करणे, या मारहाणीमुळे राज्यभरातील पत्रकारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, या पिडीत पत्रकारांना न्याय देण्यासाठी त्यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घेण्याची राज्यातील समस्त पत्रकार संघटनांची मागणी असणे, या प्रकरणातील दोषी पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी करणे, तोपर्यंत त्यांचे विरुध्द निलंबनाची कारवाई करण्याची पत्रकारांची मागणी असणे, गुन्हेगार सोडून पत्रकारांवर पोलीसांनी केलेल्या बेकायदा कारवाई व मारहाणीमुळे पोलीसांबद्दल जनतेतही संताप व्यक्त होणे, या प्रकरणी पत्रकारांवरील गुन्हे मागे घेऊन दोषी पोलीसांवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. सुभाष झांबड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"औरंगाबाद येथील सिडको-हडको भागातील मालमत्ता धारकांना पी.आर.कार्ड देण्याची व मालमत्ता धारकांना त्यांची मालमत्ता लिज होल्ड वरुन फ्री होल्ड करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, याअनुषंगाने सदरचे प्रकरण तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ३० मार्च, २०११ रोजी संबंधित विभागाकडे पाठविलेले असणे,

एकंदरीत सदर मागणी शासनाच्या विचाराधीन असतानाही सिडकोचे कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या नुकत्याच पार पडलेल्या दौ-यात सिडकोवासियांना मालकी हक्क देता येणार नाही, हे विधान करणे, हे विधान दिशाभूल करणारे असणे, येथील नागरीकांनी जागेची मालकी द्यावी यासाठी शासनाकडे वारंवार मागणी करुनही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, यामुळे शासनाने सिडको-हडको मालमत्ताधारकांना मालकी हक्क प्रदान करुन मालमत्ताधारकांना पी.आर.कार्ड देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. अनिल भोसले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंद करण्यात आलेले मे.आर.ए.घुले या कंत्राटदारांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या कंत्राटाची नोंद केल्याचे उघडकीस येणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक,ठाणे यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांना पाठविलेल्या अहवालामध्ये या कंत्राटदार कंपनीच्या विरोधात ३१ आक्षेपार्ह नोंदी घेऊन यात श्री.आर.ए.घुले, पालघर, ठेकेदार आणि मे.प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांच्याबाबत धुळे म.न.पा.अंतर्गत येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेतील कामात अनेक अनियमितता, गंभीर स्वरुपाच्या व अक्षम्य त्रुटी असल्याची नोंद जीवन प्राधिकरण विभागाच्या गुणवत्ता व दक्षता पथक यांनी नोंद केलेली असणे, धुळे म.न.पा.ने या दोन्ही कंपन्यांच्या गुणवत्ताहिन कार्यक्षमतेवर आक्षेप घेतलेले असून त्यांची नावे काळया यादीत टाकण्याबाबतचा अहवाल त्यांच्या रजिस्ट्रेशन प्राधिकाऱ्यांकडे सादर करण्यास सांगितलेले असणे, मे.आर.ए.घुले या कंत्राटदाराची राज्यात सात महानगरपालिकांमध्ये कामे चालू असणे, या कंत्राटदाराबाबत लोकप्रतिनिधींनी सातत्याने तक्रार संबंधित शासकीय संस्थांना केलेली असणे, परंतु संबंधित धुळे महानगरपालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे या कंत्राटदारावर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, यामुळे शासनाचे खूप मोठे आर्थिक नुकसान होत असणे, शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या या कंत्राटदाराचा परवाना रद्द करुन व त्याला पाठीशी घालून सहकार्य करणाऱ्या नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत

शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"उल्हासनगर महानगरपालिकेस (जि.ठाणे) जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निमाण अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्याकरिता १२७.६५ कोटी रुपये निधी उपलब्ध होणे, सदर काम वेळेत पूर्ण न झाल्याने कंत्राटदाराला वाढीव दरानुसार उक्त प्रकल्पाकरिता अंदाजित २५८.२५ कोटी रुपये उपलब्ध करून देणे, मुख्य पाईप लाईन ते घरापर्यंत नळजोडणी देण्याकरिता बेकायदेशीररित्या नागरिकांकडून रुपये १० ते १५ हजार घेणे, कंत्राटदाराकडून फक्त ४ ते ५ पाण्याच्या टाकीचे व मुख्य पाईप लाईनचे बांधकाम करण्यात आलेले असतानाही प्रकल्पातील २५६.५४ कोटींची कामे पूर्ण झाल्याचे दाखवून रु. २४३.५४ कोटी निधी कंत्राटदारास वर्ग करणे, उल्हासनगर पाणीपुरवठा योजना पूर्ण झालेली असतानाही अद्याप कार्यान्वित नसणे, सदर प्रकल्पातून अद्यापही नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येत नसल्याने, शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होणे, सदर पाणीपुरवठा प्रकल्पाची गुणवत्ता व फलनिष्पत्तीची चौकशी करण्याचे आदेश सदस्य सचिव-महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना देण्यात येणे, सदर प्रकल्पात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने विशेष चौकशी समिती नेमण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **ॲड. राहूल नार्वेकर,** सर्वश्री. रामहरी रुपनवर, हरिसिंग राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मौजे भोसा, दहीसावळी गावठान, लोनबेहळ, सुकळी, देऊरवाडी, कोळवण, आर्णी, जवळा जि. यवतमाळ या शेतजमिनीतून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चे चौपदरीकरणाकरीता शेतजमीन संपादीत करण्यात येत असणे, त्यानुसार शेतीची संयुक्त मोजणी झाली असणे व शेतजमीन अधिग्रहीत होत असणे, सदर शेतजमीन संपादीत करण्याचे काम सक्षम प्राधिकारी यांचेकडे असणे, वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये शेतजमीनीचे स्वरुप बघता वेगवेगळे दर स्वतंत्रपणे नमूद केलेला असणे, याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील जमीनीसाठी विभागनिहाय प्रतिचौरस मिटरचा दर स्वतंत्रपणे नमूद केलेला असणे, व याच वार्षिक मुल्यदर तक्त्यामध्ये हायवेवरील

जमीनीसाठी नमूद असलेल्या प्रांत चौरस मिटरचा दर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चौपदरी करण्यासाठी संपादीत होत असलेल्या हायवेवरील शेतजमीनीसाठी निश्‍चित करण्याबाबत स्थानिक नागरिकांची मागणी असणे, हायवे लगतच्या ५०० मीटरपर्यंत संपादीत क्षेत्राचे दर देण्याबाबत महाराष्ट्र नगर रचना व मुल्य निर्धारण कार्यालयाच्या परिपत्रकानुसार त्याची अंमलबजावणी होत नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.अमरसिंह पंडित,** डॉ. अपूर्व हिरे, श्री. नागोराव गाणार, प्रा. अनिल सोले, सर्वश्री.धनंजय मुंडे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्याच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये खाजगी कोचिंग क्लासेसने पर्यायी व्यवस्था निर्माण करणे, करोडो रुपयांच्या जाहिरातींमुळे खाजगी कोचिंग क्लासेसकडे सर्वसामान्य विद्यार्थी आकर्षिला जाणे,खाजगी क्लासेसमुळे अनुदानित महाविद्यालयामध्ये दैनंदिन क्लासेस बंद पडण्याची वेळ येणे, विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांचे अमिष दाखवून खाजगी क्लासेस चालकांकडून अवाजवी फी वसुल केली जात असणे, खाजगी क्लासेसचे फॅड दिवसेंदिवस वाढतच चालल्याचे निदर्शनास येणे, पालकांकडून लाखो रुपयांची वसुली करणाऱ्यांकडून शिकवण्याचे काम उरकून घेतले जात असल्याचे निदर्शनास येणे, सर्वसामान्य पालकांची मात्र पाल्याचे भविष्य घडवितांना आर्थिक लुटमार होत असल्याचे निदर्शनास येणे, मात्र, त्याविरोधात कुणाकडेही दाद मागता येत नसणे, शहरात गल्लीबोळांपासून ते हायफाय कॉम्प्लेक्समध्ये खाजगी क्लासेसची दुकाने थाटामाटात सुरु असणे, शाळांपेक्षाही भरमसाट शुल्क आकारणाऱ्या खाजगी क्लासेसमधील शिक्षकांची गुणवत्ता तपासण्याचे अधिकार राज्यातच नव्हे, तर देशभरात कोणालाच नसणे, खाजगी क्लासेसवाल्यांना शिक्षण विभागाकडे कोणत्याही स्वरुपाच्या परवानगीसाठी जावे लागत नसल्याने त्यांचेमार्फत शिक्षणाचे बाजारीकरण सुरु असणे, व्यावसायिकतेतूनच ही खाजगी क्लासेस चालविली जाणे, क्लासेसमध्ये आवश्यक शैक्षणिक निकष, गुणवत्ता व अर्हतेबरहुकूम शिक्षणाचा दर्जा नसतांनाही पालक व विद्यार्थ्यांची दिशाभूल केली जाणे, अनेक ठिकाणी विशेषत: मराठवाड्यातील बीड सारख्या जिल्ह्यात खाजगी कोचिंग क्लासेसवाल्यांनी स्वयं अर्थसहाय्यीत महाविद्यालये सुरु करणे, प्रत्यक्षात महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांद्वारे क्लासेस मध्ये अध्यापन केले जाणे, लाखो रुपये शुल्क

आकारणी करुनही शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही पायाभूत सुविधा (प्रयोगशाळा सह इतर) खाजगी कोचिंग क्लासेसकडून देण्यात येत नसणे,शासनाच्या प्रादेशिक कोटा पद्धतीमुळे मराठवाड्यातील लाखो विद्यार्थ्यांनी मेडीकल प्रवेशासाठी पश्चिम महाराष्ट्रातील महाविद्यालयात प्रवेश घेणे, खाजगी कोचिंग क्लासेसकडून असे बेनामी महाविद्यालये सुरु करुन प्रवेश देण्यात येणे, कोट्यावधी रुपयांचा आर्थिक व्यवहार होत असतांनाही खाजगी कोचिंग क्लासेसकडून उत्पन्नाच्या प्रमाणात शासनाचे शुल्क भरण्यात न येणे, यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत असणे, अनुदानित महाविद्यालये बंद पडल्यामुळे अनेक शिक्षकांच्या बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होणे, याबाबत राज्यात अनधिकृतरित्या चालविण्यात येणाऱ्या खाजगी क्लासेसवर शालेय शिक्षण विभागाचेवतीने नियंत्रण ठेवण्याबाबत विधेयक तयार करण्याची बाब अद्यापी शासनाच्या विचाराधीन असून विधी व न्याय विभागाने विधेयकातील तरतूदी व मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या श्री.अशोक प्रधान समितीच्या शिफारशी विचारात घेऊन नवीन विधेयकाचे प्रारुप तयार करता येऊ शकेल असे अभिप्राय मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये दिलेले असणे, उक्त कार्यवाही व नविन विधेयकाचे प्रारुप सत्वर तयार होऊन त्यास अंतीम मंजुरी मिळण्याची व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित तसेच गुणवत्ता विचारात घेता ते सत्वर अंमलात येण्याची आवश्यकता तसेच विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक लूट थांबवून अशा फसवणूकीसंदर्भात शासनाने करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना व शासन प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. दत्तात्रय सावंत,** श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळातील २००३-०४ ते २०१०-११ वर्षातील वाढीव शिक्षकांच्या ९२६ पदांना दिनांक २१ मे, २०१४ च्या शासन आदेशाने मान्यता देण्यात येणे, सदर पदांच्या मान्यतेस अधीन राहून विभागीय उपसंचालकांनी बिंदू नामावली प्रमाणे संबंधित शिक्षण संस्थेतील प्राध्यापकांना वैयक्तिक मान्यता देणे,पदव्युतर शिक्षण घेऊन १४ ते १५ वर्षे अध्यापनाचे कार्य विना वेतन करण्याची वेळ संबंधितावर येणे, सदर वाढीव पदांपैकी राज्यातील १७१ पदांना आजपावेतो आवश्यक असणा-या निधीची तरतूद न करणे, वेतनासाठी लागणारा निधी शासनाकडून मंजूर करण्यात न येणे, त्यामुळे उच्च विद्या

विभूषित तरुणांचा शिक्षणाच्या क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे, पूर्णवेळ काम आणि शून्य दाम यामुळे आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागणे,तसेच सन २०११-१२ पासून अनुदानित कार्यभारातून निर्माण झालेली पदे राज्यातून विभागीय उपसंचालक कार्यालाकडून मंजूर होऊन ती पदे मंजुरीसाठी गेली अनेक दिवस मंत्रालय स्तरावर प्रलंबित असणे, सदर पदे घोषित करून तात्काळ अनुदान मिळावे म्हणून संबंधितानी अर्ज विनंत्या आंदोलने करणे, याबाबत लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी करण्यात येणे, तरी सदर पदांना चालू अधिवेशनात आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करून विना वेतन कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका."

(८) **सर्वश्री. विक्रम काळे**, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, ॲड. जयदेव गायकवाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील शासन मान्य अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्येनुसार संच मान्यता करण्यात येणे, संच मान्यतेनुसार शिक्षकांची रिक्त पदे असणे, परंतु दिनांक २ मे, २०१२ नंतर शिक्षक भरती बंद असणे, परंतु विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये गणित, इंग्रजी, विज्ञान इत्यादी महत्वाच्या विषयाच्या शिक्षकांची नियमानुसार नियुक्ती करण्यात येणे, त्या नियुक्तीस संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी नियमाप्रमाणे मान्यता देण्यात येणे, परंतु या नियुक्त्या बोगस आहेत असा भास निर्माण करुन नाहकपणे शिक्षकांना व शाळांना त्रास देण्याच्या हेतूने गेले ५ वर्षे ज्ञानदानाचे काम करणाऱ्या शिक्षकांच्या मान्यता रद्द करण्याचा शिक्षण विभागाने निर्णय घेणे, शिक्षकांचा यात कसलाही दोष नसणे, या निर्णयामुळे शिक्षकांचे कुटुंब उघडयावर येणे, परिणामी त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, संच मान्यतेप्रमाणे व रोस्टरप्रमाणे दिलेल्या नियुक्त्या नियमित कराव्यात यासाठी शिक्षकांनी शासनाकडे वारंवार मागणी करणे, तरीही शासनाने त्याची दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. रामनिवास सिंह,** विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन स्थापन करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेऊन याकरीता मुंबईतील कालीना कॅम्पस येथे हिंदी भाषा भवनाकरिता भुमिपूजन होणे. सदर

डॉ.राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवनाकरिता जिल्हाधिका-यांमार्फत दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन मुंबई विश्वविद्यालयाच्या खात्यात जमा देखील झालेले असणे, परंतु अदयापी हिंदी भाषा भवन स्थापन करण्याचा प्रस्ताव धुळखात शासनाकडे पडून असणे, ह्या हिंदी भाषा भवनाकरिता मंजूर झालेला निधी शासनाकडे परत जाण्याची शक्यता, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ रोजी मुंबई विश्वविद्यालयाच्या रजिस्ट्रार यांना पत्र लिहून "हिंदी भाषा भवन" करिता मंजूर झालेल्या निधीपैकी झालेल्या खर्चाचा हिशोब देण्यात यावा व उर्वरित निधी परत करण्याबाबत सूचना करण्यात आलेल्या असणे, उक्त हिंदी भाषा भवन होण्याबाबत लोकप्रतिनिधिंनी सातत्याने विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही अदयापही कोणतीच कार्यवाही न होणे, मुंबई शहरात हिंदी भाषिकांची वाढलेली संख्या लक्षात घेता हिंदी भाषा भवन तातडीने होणे गरजेचे असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी हिंदी भाषिकांमध्ये पसरलेली प्रचंड नाराजी, सदर प्रकरणी सखोल चौकशी करून शासनाने तात्काळ निर्णय घेऊन "हिंदी भाषा भवन" मंजूर झालेल्या जागेतच बांधण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **ॲड. जयदेव गायकवाड,** श्री. नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी स्मार्टसिटी योजनेत पुणे शहराचा समावेश झालेला असणे, त्यात एरिया डेव्हलपमेंटसाठी औंध-बाणेर भागाची निवड करण्यात आलेली असणे, त्यानुसार योजनेअंतर्गत शहरात आणि औंध-बाणेर भागासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाचा दिनांक २५ जून, २०१६ रोजी मा.पंतप्रधान यांच्या हस्ते शुभांरभ करण्यात आलेला असणे, यात स्मार्ट सिटीतील एरिया डेव्हल्पमेंटमध्ये येत असलेल्या औंधमधील सर्वे नं. १५८/१५९ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसाहत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (एसआरए) पुर्नविकासित करण्याच्या कामाचा समावेश असणे, मात्र अद्यापपर्यंत या चारशे ते साडेचारशे झोपडया असलेल्या वसाहतीचा पुर्नविकास झालेला नसणे, येथे पुर्नविकास करीत असलेल्या सम्यक गृहनिर्माण संस्थेकडून या ठिकाणी विकासकाकडे केवळ सर्वे नं.१५९ ची मालकी असणे, या ठिकाणच्या पात्र व अपात्र झोपडपट्टीधारकांची यादीही विकासकाकडून निश्चित केलेली नसणे, तसेच या योजनेचा प्रस्तावही एसआरए प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी वर्षभरात दाखल

झालेला नसणे, त्यामुळे ही पुनर्विकासाची योजना केवळ कागदावरच राहिलेली असणे, मा.पंतप्रधान यांच्या हस्ते उद्‌घाटन होऊनही ही योजना अद्याप कार्यान्वित न झाल्याने औंध-बाणेर येथील व पुणे शहरातील झोपडपट्टी रहिवाश्यांच्या मनात ही योजना पूर्ण होईल की नाही अशी शंका निर्माण होणे, सर्वे क्र. १५८/१५९ येथील पुनर्विकास योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"चेंबूर, मुंबई येथील अमर महल परिसरात एसआरए योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीचे वीज बिल विकासकाने न भरल्याने वीज कंपनीने या इमारतीची वीज जोडणी तोडली असल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये उघडकीस आलेली असणे, अरिहंत नावाच्या विकासकाने पंचशील नगर, अमर महल येथे एसआरए योजना राबवून १७ मजल्यांची इमारत उभी केलेली असणे, विकासकाने प्रकल्प राबविण्याअगोदर दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता न केल्याने या रहिवाशांना नरकयातना सहन कराव्या लागत असणे, विकासकाने १० वर्षे मेटेनन्स फ्री करणार असल्याचे आश्वासनही दिलेले असणे, मेटेनन्स फ्री करणार असे आश्वासन देऊनही इमारतीतील पॅसेजमध्ये असलेल्या वीजेच्या दिव्यांचे तसेच लिफ्टचे आलेले बिल भरण्यास नकार देणे, वीजेचे बिल न भरल्यामुळे रिलायन्स कंपनीने वीज बंद केलेली असणे, इमारतीच्या लिफ्ट विजेअभावी बंद असल्याने शाळकरी मुले, आबाल-वृध्दांना १७ मजले चढून जाण्याची वेळ येणे, तसेच वीजेअभावी पाण्याची मोटरदेखील सुरु होत नसल्याने पाण्याअभावी रहिवाशांचे हाल होत असणे, परिणामी विकासकाच्या या मुजोरीमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, अरिहंत बिल्डर्स या विकासकाने रहिवाशांच्या केलेल्या फसवणूकीबाबत तातडीने फौजदारी कारवाई करुन त्याचे मुंबई शहर अथवा उपनगरात सुरु असलेले अनेक प्रकल्प तातडीने बंद करुन सील करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

(१२) **सर्वश्री. रामहरी रुपनवर,** शरद रणपिसे, संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत अपंग शिक्षक/कर्मचाऱ्यांचे अपंग प्रमाणपत्राची दुसऱ्या मेडीकल बोर्डा मार्फत इन कॅमेरा तपासणी

करण्याबाबत निवेदन प्राप्त होणे, त्या निवेदनामध्ये बोगस अपंग कर्मचारी हे बदलीस पात्र असतांना अपंग प्रमाणपत्राच्या आधारे अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असणे, त्यामुळे त्याठिकाणच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर अन्याय होणे, अशा बोगस अपंग प्रमाणपत्राच्या आधारे बदली समायोजन प्रक्रियेमध्ये सुट घेणे तसेच बस/रेल्वे प्रवास सवलत घेणे, आयकर मध्ये सुट घेणे, भत्ता, पदोन्नती इत्यादी सवलतीचा फायदा घेऊन शासनाचे आर्थिक नुकसान करणे, तसेच तत्कालीन मु.आ.अ.जि.प. यवतमाळ यांनी बोगस अपंग कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन तो प्रस्ताव कार्यवाहीसाठी शासनास पाठविणे, मागील वर्षी आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी शिक्षक बदली व समायोजन प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबतचा ठपका ठेवून असे असतांना प्रशासनाने संबंधितावर कोणतीही कार्यवाही न करणे, यवतमाळ पं.स.अंतर्गत चालू वर्षात बदली व समायोजन प्रक्रियेमध्ये शिक्षकांचे अपंग, बोगस प्रमाणपत्र आढळून येणे, गट शिक्षणाधिकारी यांनी बदलीस पात्र शिक्षकांची यादी उशिरा लावणे व दोनदा यादी बदलून नव्याने प्रसिध्द करणे, पुन:श्च त्याच यादीमध्ये अपंग कर्मचाऱ्यांना सवलत नाकारणे, त्यामुळे प्रशासनामध्ये होणारा सावळा गोंधळ त्यावर वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करुन पडदा पाडणे, यासंदर्भात दोषी असणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **सर्वश्री. अब्दुल्लाखान दुर्राणी**, धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमभंग करीत जवळपास ८ ते १० कोटी रूपयांचा गैरप्रकार करणे, स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमात लाभार्थ्यांच्या साहित्य खरेदी साठीची रक्कम खात्यात (DBT) जमा न करणे, लाभार्थ्यांकडून नियमबाह्य प्रॉमिसरी नोट लिहून घेत हित संबंधातील व्यवसायिकांना चार कोटी रुपये अडव्हान्स देयकाव्दारे अदा करणे व लाभार्थ्यांचा हक्क, अधिकार डावलणे, तर शौचालयाच्या लाभार्थ्यांना द्यावयाच्या अग्रिमाची रक्कमही जि.प.उपमुख्यकार्यकारी यांच्या स्वाक्षरी विनाच परस्परच आपल्या पदाचा दुरूपयोग करीत साडेतीन कोटीची रक्कम एरंडेश्वर व दुर्डी येथील संस्थांच्या खात्यात RTGS व्दारे जमा करणे, वित्तीय मर्यादा डावलीत व वरिष्ठ अधिकाऱ्यांची पुर्व परवानागी न

घेताच स्वत:च्या केबिनसाठी व निवासस्थानासाठी सुमारे ३१ लाख रूपयांची दुरूस्ती दाखवीत, उधळपट्टी करणे, वरिष्ठ स्तरावरुन आदेश नसल्याचे सांगत लाल दिव्याचा वापर करून शासन आदेशाची पायमल्ली करणे, जि.प तील महिला अधिकारी, कर्मचारी यांच्याशी अश्लील व अवमानकारक वक्तव्ये अशी कृती केल्या बाबत महिलांनी सन २०१६-२०१७ दरम्यान थेट मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी तक्रार नोंदवूनही त्या पिडीत महिलांना न्याय न मिळणे, वरील सर्व प्रकरणी परभणी-हिंगोलीचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१७ दरम्यान मुख्य सचिव यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवूनही मंत्रालय स्तरावरून त्यांच्या विरूध्द कार्यवाही न होणे, तसेच त्यांचे गैरव्यवहार दडपण्याचा प्रकार करण्यात येणे, पैशांची उधळपट्टी व अपहार होत असतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेविरुध्द कारवाई व निलंबन न करता शासन स्तरावरून त्यांना पाठीशी घालण्यात येणे, त्यामुळे जिल्हाभरातील जनतेत निर्माण झालेले संशयाचे व संतापाचे वातावरण, या बाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(१४)** **सर्वश्री. सुनिल तटकरे,** धनंजय मुंडे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. किरण पावसकर, जयंत पाटील, बाळाराम पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"हरीहरेश्वर हे महाराष्ट्रातील प्रमुख तिर्थक्षेत्र असणे, दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरीहरेश्वर मध्ये लाखो भाविकांची ये जा असणे, त्या पार्श्वभूमीवर तिर्थक्षेत्रासाठी पर्यटन विकास योजनेअंतर्गत मौजे. मारळ, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील हरिहरेश्वर-मारळ पाणी पुरवठा योजना जलसंपदा विभाग (लघुपाट बंधारे स्थानिक स्तर) मार्फत सन २०१० मध्ये मंजुर होणे, या योजनेत बागमांडला, दांडा, हरेश्वर (देवघर), काळींजे व मारळ या पाच ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा करणे अपेक्षित असणे, यासाठी हरेश्वर येथील रहिवासी असणाऱ्या मारळ हद्दीतील जवळपास २२ शेतकऱ्यांच्या जमिनी शासनामार्फत सार्वजनिक प्रयोजनासाठी या बाबीखाली संपादित होणे, पाच ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा होणार असल्याने शेतकऱ्यांनी भूसंपादनावेळी विना अट जमिनी देणे, पर्यटन विभागामार्फत या योजनेसाठी सुमारे २७ कोटी रुपये मंजुर होणे, परंतू भूसंपादन प्रक्रिया अपुर्ण असल्याने सदरची योजना अद्यापही कार्यान्वित न होणे, भूसंपादनाच्या ९ (१) पर्यंतच्या नोटीस शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या असणे, सद्यस्थितीत सातबारावर इतर हक्कात

योजनेसाठी जमिन भूसंपादन झाल्याचे नमूद असणे, मात्र सुरूवातीचे १४५ दिवस व  फक्त एक वर्षाचे भूभाडे काही शेतकऱ्यांना अदा करण्यात येणे, तद्नंतर मात्र भूभाडे अथवा मुल्यांकनाप्रमाणे किंमती अदा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये या योजनेविषयी तीव्र असंतोष निर्माण होऊन संभ्रम तयार होणे, विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या मार्फत अद्याप भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण न होणे, निधी अभावी भूभाडे देता येत नसल्याचे रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांचे मार्फत कळविण्यात येणे, प्रत्यक्षात जमिन संपादित होऊन चार वर्षांचा अवधी उलटुनही नुकसान भरपाईसाठीचा अंतिम निवाडा जाहीर झालेला नसणे, दिनांक १ मे, २०१७ रोजी ही योजना हेटवणे प्रकल्प, विभाग, पेण यांच्याकडे हस्तांतरीत झालेली असणे, त्यामुळे ही योजना प्रलंबित राहण्याची शक्यता निर्माण होणे, स्थानिक शेतकऱ्यांनी सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत भूसंपादन कायदा १९८४ चे कलम ११ प्रमाणे अंतिम निवाडा व सुधारित भूसंपादन कायदा २०१३ (The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act. 2013 ) चे कलम २४ प्रमाणे नुकसान भरपाई देण्याविषयीची आग्रही मागणी करणे, याकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष करणे, स्थानिक शेतकऱ्यांमध्ये त्यामुळे पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१५) **सर्वश्री. सतिश चव्हाण,** अमरसिंह पंडित, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात यावर्षी बीटी कपाशी बियाणांची मोठ्या प्रमाणावर लागवड होणे, सुमारे १ कोटी ७५ लाख बीटी कपाशी बॅगची राज्यात विक्री झालेली असणे, बीटी कपाशी बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी हे बियाणे बिजी-२ तंत्रज्ञानावर आधारित असल्याचा दावा करणे, बिजी-२ हे तंत्रज्ञान बोंड आळीला प्रतिकारक असल्याचा दावा करणे, बियाणे उत्पादक कंपन्यांनी तसे विक्री पाकिटावर नमूद केलेले असणे, तसेच विक्री पाकिटावर बोलगार्ड - २ तंत्रज्ञानाचा व बियाणांमध्ये ट्रान्सजेनिक जीन असल्याचा उल्लेख करणे, बोलगार्ड-२ तंत्रज्ञान पुरविणाऱ्या कंपनीने हे तंत्रज्ञान शेंदरी बोंड आळीस प्रतिकारक असल्याचे नमूद करणे, असे असतांनाही राज्यातील लाखों शेतकऱ्याच्या शेतातील कपाशीवर ४० ते ४५ दिवसात शेंदरी बोंड आळीसह इतर रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होणे, बियाणे

उत्पादक कंपन्यांनी शेतकऱ्यांची करोडो रुपयांची फसवणूक करणे, यामुळे लाखो शेतकऱ्यांचे सुमारे १४ हजार कोटी रुपयांचे नुकसान होणे, मागील वर्षी परवाना निलंबित केलेल्या १७ पैकी १४ कंपन्यांना संशयास्पद पुन्हा परवाना दिल्याने मागील प्रतिबंधित वाण बाजारात विक्री केल्याचा संशय निर्माण होणे, त्यामुळे कोट्यावधी रुपयांची फसवणूक या कंपन्यांनी केल्याचे उघडकीस येणे, बिजी-२ तंत्रज्ञान आणि असे बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांकडून होणाऱ्या फसवणूकीबाबत राज्य शासनाने केंद्र सरकारला अहवाल सादर करणे, बीजी - २ हे निरूपयोगी वाण बीटी कपाशी श्रेणी मधून वगळण्याची मागणी करणे, सी.आय.सी.आर. मधील शास्त्रज्ञांनी बिजी-२ ची शेंदरी आळी बाबतीत प्रतिकारक क्षमता कमी होत असल्याचे संशोधन करून त्यास बियाणे उत्पादक कंपन्या जबाबदार असल्याचे नमूद केलेले असणे, शेतकऱ्यांची फसवणूक झाल्या प्रकरणी शेतकऱ्यांच्या तक्रारी दाखल करून न घेणे, तक्रारी दाखल करण्यास आडकाठी आणल्यामुळे अनेक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहणे, बायो पेस्टीसाईड परवाने देतानाही मोठा आर्थिक गैरव्यवहार झालेला आसणे, परवाना धारक कंपन्यांनी एकसारखाच ट्रायल रिपोर्ट आणि डेटा दाखल करून परवाने घेणे, बीटी वाण असल्याचे भासवून नॉन बीटी वाण विक्री करणाऱ्या कंपन्याचे परवाने निलंबित करून त्यांचे विरुद्ध गुन्हे दाखल करण्याची मागणी होत असणे, शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे झालेले नुकसान, नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१६) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"कोल्हापूर विभागीय महावितरण कार्यालयाकडील कृषी पंपासाठीची प्रतिक्षा यादी दिवसेंदिवस वाढत असून त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचे माहे जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कोल्हापूर व सांगली या दोन जिल्हयातील २२ हजारांहून अधिक शेतकरी गेल्या ३ वर्षापासून वीज जोडणी मिळण्याच्या प्रतिक्षेत असताना केवळ ८ हजार शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळाली असणे, तसेच तातडीने जोडणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांना स्वखर्चाचा भूर्दंड सोसावा लागत असणे, शेतकऱ्यांना गरजेनुसार वीज जोडणी मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे उभे पीक करपत असून शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत असणे, याप्रकरणाकडे

शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शेतक-यांची प्रतिक्षा वाढत असणे, त्यामुळे हतबल झालेला शेतकरी वर्ग, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व संतापाची भावना, याबाबत शासनस्तरावरुन विशेष मोहिम राबवून प्रतिक्षा यादीतील सर्व शेतकऱ्यांना लवकरात लवकर वीज जोडणी देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१७) **सर्वश्री. जयवंतराव जाधव,** धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, अमरसिंह पंडित, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नाशिक संदर्भ सेवा रुग्णालयातील मूत्रपिंड प्रत्यारोपण विभाग कागदोपत्रीच चालू असणे, मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी मान्यता मिळालेली असूनही यासाठी आवश्यक नेफ्रॉलॉजिस्ट, तंत्रज्ञ, आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्रीची पूर्तता झालेली नसणे, डायलीसीससाठी दरदिवशी २० रुपयांची प्रतीक्षा यादी असणे, तीन सत्रात डायलीसीस करण्यासाठी रुग्णालयास १० डायलीसीस यंत्र व डायलीसीस खुर्च्यांची तसेच आवश्यक मनुष्यबळाची निकड असणे, देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतूद नसल्यामुळे रुग्णालयातील वातानुकुलित यंत्रणा व लिफ्ट वर्षभरापासून बंद असल्यामुळे सदर रुग्णालय मृत्यूशय्येवर असणे, अमरावतीच्या संदर्भसेवा रूग्णालयाप्रमाणे नाशिक संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये प्लास्टीक सर्जरी, न्युरोलॉजी आणि पेडियाट्रिकसह इ. विकारांवरील विभाग सुरु करण्यासाठी येथे दोन मजले वाढवून २०० बेडचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, रुग्णालयातील यंत्रणा व देखभाल दुरुस्तीच्या समस्येबरोबरच मंजुर आकृतीबंधाप्रमाणे ३६७ पदांपैकी ९२ पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल सुरु असणे, असाध्य व दुर्धर आजारांच्या निदान व उपचारांसाठी सर्वसामान्यांच्या दृष्टीने संजीवनी ठरलेल्या नाशिकच्या विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य वीमा योजनेअंतर्गत उपचारासाठी रुग्णांना तीन - तीन महिन्यांची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास येणे, या रुग्णालयातील अतिविशेषोपचार तज्ञ, वैद्यकीय अधिकारी व परिचारिका इत्यादी शेकडो पदे रिक्त असणे, तसेच सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असणे, येथील कामाचा व्याप लक्षात घेता आकृतीबंधाव्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात वैद्यकीय व शुश्रुषा संवर्गातील परिचारिकांची पदे नव्याने निर्माण करून सदर पदे भरण्याबाबत विभागीय उपसंचालकांनी

शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असणे,वाढत्या रुग्णसंख्येमुळे या रुग्णालयाचे २०० बेडमध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव असणे, सदर विभागीय संदर्भसेवा रुग्णालयामध्ये शासकीय वैद्यकीय पदव्युत्तर महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या लालफितीत अडकलेला असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे - (जोडपत्र पहावे.)**

**सहा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# — मध्यंतर —

**सात : शासकीय विधेयके -**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) ग्रामविकास मंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.

(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री

(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.

(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.

(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.

(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.

(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) पणन मंत्री

(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५४ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) विधेयक, २०१७"**

---

**(७) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(८) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे -**
**"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४९ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(ग) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५९ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(घ) विधानसभेने सुधारणांसह दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(ङ) विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व**

**संमत करणे.**

**(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ - शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**आठ : (गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) —**

**सर्वश्री. धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, जयंत पाटील, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, संजय दत्त, सतिश चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयवंतराव जाधव, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री.दत्तात्रय सावंत, विक्रम काळे, श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदुरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"राज्यात ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, विविध खात्यांमध्ये उघडकीस येत असलेले वेगवेगळ्या प्रकारचे घोटाळे, मराठवाड्यासह संपुर्ण महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिकाला धोका निर्माण होऊन उद्‌भवलेली दुष्काळी परिस्थिती, राज्याच्या गृहनिर्माण मंत्र्यांनी स्वत:च्या पदाचा गैरवापर करुन विकासकाच्या फायद्यासाठी घेतलेली भूमिका, एस.आर.ए. प्रकल्पातील अनागोंदी कारभार, म्हाडा इमारतीच्या पुर्नविकासात झालेला प्रचंड गैरव्यवहार, वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या व्हायरल झालेल्या ऑडीओमुळे करोडोंच्या भ्रष्टाचाराची उघडपणे सुरु असलेली चर्चा, एम.आय.डी.सी. मध्ये जमिनी विनाअधिसूचित करण्याच्या व भूखंड वाटपाच्या प्रक्रियेत झालेला घोटाळा, अशाप्रकारचे अनेक घोटाळे समोर येऊनही संबंधितांवर कारवाई न होणे, याचप्रमाणे शासनात व प्रशासनात मोठ्या प्रमाणात दलालांची झालेली घुसखोरी, यामुळे सामान्य

जनतेत प्रशासनाविषयी निर्माण झालेला तीव्र असंतोष, मंजुळा शेटे प्रकरणानंतर जेलमधील सुरक्षेबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, जेल प्रशासनामध्ये वाढता भ्रष्टाचार, पोलीस दलातील बदल्यांचे रॅकेट उघडकीस येणे, महिलांवर वाढलेले अत्याचार, एकूणच राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, ती राखण्यामध्ये अपयश आल्याने मा. न्यायालयाकडून राज्य सरकारवर ओढण्यात आलेले ताशेरे, पावसाने जूनमध्ये सुरुवात केल्यानंतर जुलै-ऑगस्टमध्ये दडी मारल्याने संपूर्ण महाराष्ट्रात दुबार पेरणीही वाया जाऊन तिबार पेरणी करण्याची आलेली परिस्थिती, कर्जमाफीची रक्कम अद्यापही शेतकऱ्यांपर्यंत न पोहचल्याने वाढीव बियाणे घेण्यासाठी शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक, पीक विम्याचा गोंधळ, शेतमालाला भाव मिळत नसल्याने व चालू खरीप हंगामही वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढण्याची भिती, त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली मागणी, एकूणच सर्वसामान्य नागरीक, महिला, शेतकरी, कर्मचारी या सर्वांमध्ये राज्य शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, विविध घोटाळे उघडकीस येऊनही त्याबाबत कोणतीही कारवाई न झाल्याने हे शासन भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असल्याची निर्माण झालेली भावना, या सर्व बाबतीत शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : (गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक (क) व (घ)) —**

**(क)** **सर्वश्री. शरद रणपिसे,** धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, प्रा. जोगेन्द्र कवाडे, श्री.कपिल पाटील, ॲड. जनार्दन चांदुरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री.अमरसिंह पंडित, सुभाष झांबड, किरण पावसकर, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.सतिश चव्हाण, अमरनाथ राजुरकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, ख्वाजा बेग, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री.आनंद ठाकूर, हरिसिंग राठोड, अब्दुल्ला खान दुर्राणी, आनंदराव पाटील, विक्रम काळे, नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री. प्रकाश गजभिये, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा व मंत्र्यांचे उत्तर) —**

"मुंबईसह राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांची डबघाईला आलेली आर्थिक परिस्थिती, नवनिर्मित नगरपंचायतींमध्ये असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, त्यामुळे विकासकामात होत असलेले अडथळे, सर्व महानगरपालिकांमध्ये पायाभूत सुविधांचा उडालेला

बोजवारा व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, मालमत्ता कराच्या संकलनात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असणे, जी.एस.टी. मुळे महानगरपालिकांना एलबीटीची प्रतिपूर्ती करण्यात न आल्यामुळे महानगरपालिका व नगरपालिका यांची अर्थव्यवस्था कोलमडून जाणे, मुंबई महानगरपालिकेतील रस्ते, नालेसफाई व डंपिंगच्या संदर्भातील गैरकारभाराच्या चौकशीचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी देऊन त्यावर पुढे कोणतीच कार्यवाही न होणे, जेएनएनयूआरएम योजना बंद केल्यामुळे अपूर्ण राहिलेल्या प्रकल्पासंबंधी शासनाची भूमिका, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाचा उडालेला बोजवारा, बहुतांशी नगरपरिषदांत चटईक्षेत्र, टीडीआर व ऑटो डीसीआर घोटाळे शासनाच्या निदर्शनास आणून अद्यापही कोणतीच कारवाई न होणे, राज्य शासनाने रियल इस्टेट कायदा मंजूर करणे, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याने रियल इस्टेट कायदा मंजूर केल्यानंतर बांधकाम व्यावसायिकांमध्ये निर्माण झालेली चिंतेची परिस्थिती, या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे शासनाकडूनच निर्माण होत असलेले अडथळे, मुंबईतील मैदानांचा लिलाव, गृहनिर्माण धोरण अनिश्चिततेमुळे रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प, एसआरए अंतर्गत रखडलेले प्रकल्प व धारावी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडा वसाहती, बीडीडी, बीआयटी चाळी व उपकरप्राप्त इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, संक्रमण शिबीरातील घुसखोरीचा प्रलंबित प्रश्न, मुंबई शहरासह अन्य महानगरांमध्ये निर्माण झालेली वाहतुकीची समस्या, बेस्ट प्रशासन व मुंबई महापालिका आयुक्त यांच्यातील संघर्ष विकोपाला जाणे, मुंबई महापालिका, एमएमआरडीए, म्हाडा आणि सिडको यांच्यात असलेला समन्वयाचा अभाव, सिडकोकडून देण्यात आलेल्या भूखंडाचा होणारा दुरुपयोग, विविध स्थानिक स्वराज्य संस्थातील सफाई कामगारांच्या समस्यांकडे झालेले दुर्लक्ष तसेच राज्यातील जनतेची अस्मिता असलेले मुंबईतील आंबेडकर भवन महानगरपालिकेने तोडण्यास परवानगी देणे, त्यामुळे राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या नियोजनात राज्य शासन अपयशी ठरुन स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक कोंडी होऊन विकासाला बसलेला खीळ, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, कपिल पाटील, विक्रम काळे, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदुरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष

झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, राहुल नार्वेकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षणाची जबाबदारी असणाऱ्या शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण या विभागांना आपापल्या शैक्षणिक जबाबदाऱ्या योग्य पध्दतीने पार पाडण्यात अपयश आल्याने राज्यातील लाखो विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी आणि प्राध्यापकांची फरफट होत असणे, शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाचा प्रश्न कायम असणे, विनाअनुदानीत व स्वयं अर्थसहाय्यीत मराठी व इंग्रजी शाळांना आवश्यकता नसताना मोठ्या प्रमाणात मान्यता देण्यात येणे, खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळा, महाविद्यालयांवर सरकारचा कोणताही अंकुश नसणे, पटपडताळणीनंतर ऑनलाईन संच मान्यतेत अनेक त्रुटी असणे, त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचा वेतनाचा व समायोजनाचा प्रश्न निर्माण होणे, परिणामी माहे मे, २०१२ पासून शिक्षकांची भरती न होणे, शिक्षकांच्या या नियुक्त्या चुकीच्या आहेत म्हणून कार्यरत ८००० शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा चुकीचा निर्णय घेणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाचा अहवाल मान्य न करणे, मुंबई बँकेतून शिक्षकांचा विरोध असताना पगार देण्यात येणे, रात्र शाळा, रात्र कॉलेजेस बंद करण्याचा निर्णय घेतल्याने तेथील शिक्षकांच्या नोकऱ्या संपुष्टात येणे, विना अनुदानीत शाळांना २० टक्क्याच्या पलिकडे अनुदानाची तरतूद न करणे, दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजी घोषित केलेल्या अनुदानास पात्र शाळांना वेतनाची तरतूद न करणे, अनुदानास पात्र शाळा, वर्ग तुकड्या व कनिष्ठ महाविद्यालयांच्या याद्या घोषित न करणे, उर्वरित सन २०१२ च्या वर्ग तुकड्या व उर्वरीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांचे मुल्यांकन सुरू करणे, १ हजार विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेतील अर्धवेळ ग्रंथपालांना न्यायालयीन निर्णयाप्रमाणे पुर्णवेळ करणे, कला व क्रीडा शिक्षकांच्या तासिका कमी करणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीच्या व नंतरच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, ऑनलाईन वेतन प्रणालीत सुधारणा करुन वेतन महिन्याच्या एक तारखेला करणे, जिल्हा परिषद शाळांकडे सरकारचे दुर्लक्ष असणे, मराठवाड्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात मुख्याध्यापकांचे व शिक्षकांची रिक्त पदे असणे, वर्ग-२ मुख्याध्यापकांना पदावनत करणे, सदरहू शाळांच्या इमारती मोडकळीस येणे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या बदल्यासंदर्भात काढलेला चुकीचा शासन निर्णय रद्द करण्याची होत असलेली मागणी, इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचे भाषा विषयाचे तोंडी गुण रद्द करणे, विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व पुस्तके न

मिळणे, गणवेश देण्याच्या ऐवजी रोख रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा चुकीचा निर्णय  घेणे, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची मॅट्रीक व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्यास सरकारला अपयश येणे, मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या बहुतांश अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत न लागणे, विद्यापीठाचे आर्थिक नियोजन कोलमडणे, विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक बाबींचा कारभार ढासळल्याने कुलगुरुंना हटविण्याची मागणी होत असणे, शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या हजारो जागा रिक्त राहत असणे, तंत्रनिकेतन मधील कंत्राटी अधिव्याख्यातांना नियमित करण्याची मागणी, वैद्यकीय प्रवेशाच्या प्रक्रियेत बोगस डोमिसियल प्रमाणपत्राचा घोटाळा उघडकीस येणे, वैद्यकीय शिक्षण विभागात झालेल्या साहित्य खरेदीत मोठा घोटाळा उघडकीस येणे, महिला व बालकल्याण विभागाच्या खरेदीत घोळ असणे, सामान्य प्रशासन विभागाच्या वस्तु व सेवा खरेदी व नियुक्तीतील झालेले घोळ, वरील सर्व विभागामध्ये सुरू असलेला गोंधळ, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ग) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे,** श्री.प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.गोपीकिसन बाजोरिया, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.रविंद्र फाटक, तानाजी सावंत, सुजितसिंह ठाकूर, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.मितेश भांगडिया, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाड्या, वस्त्या व ग्रामीण भागातील ७२०० किमी रस्त्याच्या लांबीचे सन २०१५-१६ व २०१६-१७ करिता उद्दीष्ट ठरविलेले असणे, त्या व्यतिरिक्त राज्याच्या ग्रामीण भागात, डोंगरी विभागात तसेच छोट्या वस्त्या, वाड्या यांना जोडणारे गावपोहोच रस्ते, मार्ग व छोटे पुल, मोरी, पांदण रस्ते यांच्या बांधकामाची व यांच्या दुरुस्तीची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची आवश्यकता, राज्यातल्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दर्जावाढीचे प्रस्ताव, एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाची राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनाकरिता सन २०१५ पासून नविन कामांना निधी नसणे, व सन २०१६-१७ पासून राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना यांच्या निकषात न बसणाऱ्या व पिण्याच्या पाण्याची सोय नसणाऱ्या राज्यातील गावे, वाडे, वस्त्या यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे, ग्रामीण भागातील सर्व वाड्या, वस्त्या व डोंगरी भागातील सर्व गावाचे विद्युतीकरण करण्याची आवश्यकता, शेती पाणी पुरवठा योजनेच्या वीज दरामध्ये झालेली दरवाढ, वीज बिलाची वसुली थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(घ) **श्री.विनायक मेटे,** ॲड.अनिल परब, सर्वश्री. प्रविण दरेकर, गिरीशचंद्र व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.अनिल सोले, डॉ.परिणय फुके, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, सुजितसिंह ठाकूर, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, श्री.तानाजी सावंत, डॉ.अपूर्व हिरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात मोठ्या संख्येने मराठा समाजाची अनेक वर्षांपासून आरक्षणाची मागणी असणे, राणे समितीच्या शिफारशींना अनुसरुन मराठा समाजाला शिक्षण व नोकरीत १६% आरक्षण देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे, परंतु, त्या निर्णयाला मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने मा.न्यायालयाकडून मराठा आरक्षणाच्या निर्णयास स्थगिती मिळणे, ही स्थगिती उठविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू असणे, गेल्या दोन दशकात शेतीची झालेली दुरवस्था, त्यामुळे केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या राज्याच्या ग्रामीण भागातील मराठा समाजाची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत जाणे, परिणामी त्यांच्या मुलांची शैक्षणिक प्रगती न होणे, त्यामुळे इतर समाज गटांच्या तुलनेत आपण मागे पडतो याची खंत मराठा समाजाला अस्वस्थ करित असणे, त्याचे पडसाद राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्यातून निघणाऱ्या मराठा समाजाच्या विराट मोर्चातून प्रतिबिंबित होणे, राज्य शासनाकडून त्याची त्वरीत दखल घेण्यात येऊन राज्यातील तरुणांना शैक्षणिक व स्वयंरोजगार क्षेत्रात स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकासाचे शिक्षण देण्याकरिता "स्कील इंडिया" योजना राबविण्यात येणे, आदिवासी भागातील मुलांसाठी शैक्षणिक साहित्य पुरविण्याकरिता पंडित दीनदयाळ उपाध्याय आदिवासी विकास योजना राबविण्यात येणे, शासनाकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शैक्षणिक शुल्कातील सवलत ६ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याकरिता राजर्षी शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजना राबविण्यात येणे, मागास आयोगाची निर्मिती करण्यात येणे, डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह वेतन योजना राबविण्यात येणे, वसतीगृहात राहणाऱ्या मुलांना सुविधा पुरविण्याकरिता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची निर्मिती करुन या मंडळाकरिता भरघोस आर्थिक तरतुद करण्यात येणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळण्याकरिता केंद्र शासनाची सारथी योजना राज्यात राबविण्यात येणे, या व इतर अनेक माध्यमातून राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शैक्षणिकदृष्ट्या प्रगत होऊन व त्याला कौशल्य विकासावर आधारित स्वयंरोजगार मिळून तो स्वावलंबी होऊ शकेल अशी शासनाची भूमिका असणे, याखेरीज मराठा समाजाकडून सातत्याने मराठा आरक्षणाची मागणी होत असल्याने हा विषय शासनाने मागासवर्ग आयोगाकडे सोपविला असणे, मागासवर्ग आयोगाने या विषयाचा

सखोल अभ्यास करुन लवकरात लवकर अहवाल देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**दहा : (क) अशासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ -**

सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा (उपाययोजना) अंमलबजावणी विधेयक, २०१७ - श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(ख) अशासकीय ठराव :-**

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित अशासकीय ठराव) — (अनुक्रमांक - (१) ते (४))-**

**(१) श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर)-**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७६ —**

"राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.रामराव वडकुते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४४ —**

"राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) **श्री.अनिल भोसले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५२ —**

"राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालय नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान लहान उपचार केंद्र सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक आपतकालीन उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## राष्ट्रगीत.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० ऑगस्ट, २०१७.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.